


राज्यस्तरीय कवी संमेलन व काव्यस्पर्धा, सोलापूर २०१८

परिवर्तन

# जाणिवा परिवर्तनाच्या...

• संपादक •

डॉ. धम्मपाल माशाळकर रमजी गायकवाड

अविनाश बनसोडे वर्षाराणी सरवदे-कांबळे


Principal
...ahar Arts, Science & Co...
A..dur Tal. Tuljapur Dist,

# अनुक्रम


१. सातबारा
२. वेळ
३. धन्य बाबासाहेब
४. स्नेहबंध
५. स्पर्धेसाठी
६. आसमंत
७. तुला
८. राजकारण......
९. बाईमाणूस..
१०. स्वैराचार
११. पोरी बन तू निर्भया !
१२. व्यथा
१३. मावळतीला
१४. माणूसपण
१५. अबोला
१६. तार (पत्र)
१७. तुझे रूप
१८. प्रेमविरह
१९. शब्दांकुर
२०. भ्रष्टाचार झाला शिष्टाचार
२१. किक
२२. ओढ तुझ्या मिलनाची
२३. प्रवास माझा.......
२४. माणूस बनायचे राहून गेले..
२५. मोद हर्ष घेऊनी आले नववर्ष
२६. जखम
२७. पुन्हा जन्माला यावे राजे
२८. मी ढासळलेला पूल
२९. अश्रुंचे मोल
३०. मी कोण? प्रश्न पडला ना?
३१. प्रितीची भावना
३२. आठवण प्रेमाची
३३. एक कविता अशीही लिहावी...
३४. जीवन जगावं तरी कसं?
३५. पाझर दगडालाही फुटतो
३६. भिमराव माझा
३७. कहाणी
३८. रस्ता चुकीचा
३९. प्रज्ञासूर्य : डॉ. आंबेडकर
४०. अडवणूक
४१. युगपुरुषा
४२. अन् तोडु सर्व जाती-धर्माला
४३. पुनर्लेखन इतिहासाचे...
४४. देह
४५. पुन्हा गुलामी
४६. सावित्रीबाई फुले
४७. जयंती दिवशी
४८. प्रेम म्हणजे...
४९. हमाल
५०. फकीर
५१. धरणी
५२. जीवनदायनी
५३. तू खुश असशिल यात शंका नाही
५४. होय सर मी जात खोडली हजरीपटावरून
५५. भीमाच्या पोरा
५६. कलियुगातील रावण
५७. फुलपाखरू
५८. 'ओसाड या जीवनाला कशाचा आधार...'
५९. अपूर्ण
६०. अनास्था
६१. छत्रपती शिवाजी महाराज
६२. भारतीय
६३. अश्रुंचे मोल



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osma...

## २९. अश्रुंचे मोल

मी राहतो दुःखात गाळली आसवे जरी
नाही कळले मला अश्रूंचे मोल तरी।।१।।

मी मांडले दुःख कोरड्या मानवापुढे जरी
नाही कळले मला अश्रूंचे मोल तरी।।२।।

मुक्या संवेदना मांडल्या असंवेदन दानवा पुढे जरी
कळले नाही मला अश्रूंचे मोल तरी।।३।।

सोसले घाव अपमानाचे सन्मान न कळला जरी
कळले नाही मला अश्रूंचे मोल तरी।।४।।

विसरले भाव जगण्याचे व्यवहार न कळला जरी
कळले नाही मला अश्रूंचे मोल तरी।।५।।

-पंकज कासार काटकर, काटी

## ३०. मी कोण? प्रश्न पडला ना?

माझ्या जाणिवा-नेणिवांच्या भवसागरात अडकलास तू खरा.
कधी नजरेआड होताच मी
किती बेचैन होशील तू !
तर कधी मीच नकोसा वाटे तुला
माझ्यामुळे जग जवळ आले खरे
पण जवळच्यांना विसरलास की रे
प्रत्येकाच्या गळ्यातला ताईतच मी
पण तू मात्र ख-याखोट्याचा बांधच विसरलास की रे?
नका रे इतके नादात वाहून जाऊ?
माणसांनो माणुसकी विसरू नका रे
या मोबाईलच्या नादात अख्खी पिढी वाया गेली
असे आरोप तरी ऐकवू नका रे
सोशल मिडियावर अपडेट रहाच
पण काळाच भान थोडं ठेवा

-तिपय्या हिरेमठ

## ३१. प्रितीची भावना

काही नाही उरले आता
शब्दही माझे विरले,
होता सांज सख्या रे
प्रीत दिन का सरले.

भाव कंठी दाटून येता
तुझ्या सवेचे क्षण रडले,
तुझ्या प्रेमात अशी का
मी एकटीच पहुडले.

बहरलेल्या फुलांनी असे
का सुकायचे ठरवले
माझे जीवन असे का
कोऱ्या पाटीवर गिरवले.

आर्त ही प्रेम भावना
तुझ्या आठवांच्या रणा,
तुझ्या प्रती मनी पुन्हा पुन्हा
गूढ प्रीतीची भावना.

-श्रद्धा जोशी सोलापूर

## ३२. आठवण प्रेमाची

निखळ मादक नजर तुझी
भुरळ पाडते माझ्या मनाला
तुझ्या प्रेमाची आठवण
येते मला क्षणाक्षणाला ||

बाटलीभरअत्तरासाठी लाख
फुलांचा जातो बळी
लाख श्रृंगार सांगून जाते
तुझ्या गालावरची खळी ||

खोटी स्तुती केली नाही
तुझ्या हसण्याची व दिसण्याची
म्हणूनच मला भीती नाही
तुझ्या प्रेमात फसण्याची ||

ठाऊक असतं तुझं येण अशक्य,
तरी मन वाट पाहणं सोडत नाही,
माझ मन म्हणते जाऊ दे
पण तुझ मन मी मोडत नाही ||

कुणास ठाऊक तू आठवलीस की,
माझ वेड मन येत गं भरुन ।
आता वाटतं तुला आठवताच ,
सारं आयुष्य जाईल का गं सरुन ||

-प्रा.सत्येंद्र राऊत, अणदूर.

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

## मला तो खूप आवडतो

मला तो खूप आवडतो
त्याच्या मंगोलीयन डोळ्यांत
त्याच्या शांत चेहऱ्यात
आणि ओठानमधे शोधते मी स्वतःला
पण नाही सापडत काहीच
कारण तो फक्त
त्यांनी घडविलेल्या
लोभस गोंडस मूर्ती आणि चित्राणमधून
पोचलाय माझ्यापर्यंत
आणि हेच त्याला नको होत
म्हणून त्याच्यात मी नाही दिसत
दिसते फक्त त्याच्यासमोर
फक्त कापड बदललेली मी...
कारण त्यानं जेव्हा
पांढरी वस्त्र परिधान करायला सांगितले
तेव्हा मी फक्त
त्या मर्यादित रंगातच आडकले
त्या पांढऱ्या रंगाच्या विशालतेपर्यंत
अजून पोचलेच नाही मी...
रितसर योजना करून
त्यांनी त्याला माझ्या पर्यंत पोहचू दिल नाही
आणि कहर म्हणजे
त्यांनी मला सतत
या भ्रमात ठेवले कि मी त्याची झालीय
पण आज मला जानवतय
माझ्या त्या ढवळ्या कपड्यात
मी तितकीच स्वच्छ झालेय
जेवढी त्यांना हवी होती
बाकी माझ्या कितीक पिढ्या
पडल्यात त्या पांढऱ्या कपड्याच्या अवरनात
तशाच गलीच्छ
त्यांची घाण साफ करत
हतबल त्याची वाट पहातेय मी...
सार लख्ख होऊन
तो माझ्यात आणि मी त्याच्यात दिसावी
मला गरज नसावी
त्याला पहाण्यासाठी
त्यांनी दिलेल्या उसन्या नजरेची
तो दिवस माझा परिवर्तनाचा
आणि मग,
बुद्ध होईल मी...

-दिशा शेख

## मी सूर्य बोलतोय....

मी सूर्य बोलतोय
तो एक सूर्य होता
ही साऱ्या जगाला प्रकाशाची
किरणं वाटत सुटला
प्रकाशाची किरणं भेदत गेली,
त्या अभेद्य भिंतींनाही
जाती गोतीच्या अन् धर्मांधतेच्या
दगडी भिंतींना कापतच सुटली,
मग पाझरु लागला माणुसकीचा झरा,
माणसात असलेली माणुसकी
आणि सर्वांच्या लाल रक्ताची किंमत,
एका साक्षीची
शिक्षणाच्या नंदादीपाचं मोल
अख्या शिवारात तो वाटत सुटल
'शिका! संघटित व्हा!' या मंत्राचा
जयघोषी ठरला,
माणूस खडबडून जागा झाला,
मंत्राच्या जयघोषात सारा
आसमंत दुमदुमला
आज त्या सूर्याचा जन्म दिवस
आठवा ती प्रकाशाची किरणं,
माणुसकीच्या रक्ताची साक्ष,
शिवारापर्यंत तेवत राहणारा नंदादीप
अन् मंत्राचा घंटानाद,
सूर्य आजही बोलतो आहे,
माझ्या पुत्रांनो! जो पर्यंत
तुमच्याजवळ प्रकाश आहे
अंधार येईलच कसा?

- प्राचार्य डॉ. नसीम पठाण

संकल्प प्रकाशन, सोलापूर.
ISBN : 854-53-80315-05-07

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad